
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# आदिवासी कादंबरीतील नायक




**डॉ. संभाजी मलघे**
**इंद्रायणी महाविद्यालय,तळेगाव, पुणे**

**प्रस्तावना :**

मानवी जीवनाच्या बदलेल्या परिस्थितीत कादंबरी हा लोकप्रिय वाङ्मय प्रकार आहे. कादंबरीत कल्पित, सत्य–वास्तव दर्शन, जीवन निष्ठा या गोष्टी प्रधान असून त्यांना व्यक्तीजीवनदर्शनाच्या अथवा कथानकाच्या माध्यमातून वाचकांच्या समोर ठेवण्याचा प्रयत्न कादंबरीकार करतो. आदिवासी साहित्यिकांनी अल्प प्रमाणात हाताळलेले दिसतात.

मधु मंगेश कर्णिक यांची 'वाडगीळ', र. वा. दिघे यांची 'पानकळा', 'सराई', या कादंबऱ्या आदिवासींच्या अपरिचित विश्वासाचे चित्रण करतात. गो. नि. दांडेकर, अनिल सहस्त्रबुद्धे, दीनानाथ मनोहर, सुरेश द्वादशीवार, मधुकर वाकोडे, जगदिश गोडबोले आदि आदिवासीतर साहित्यिकांनी आदिवासी विषयक कादंबरी या वाङ्मय प्रकारात लेखन झाल्याचे दिसते. याच पार्श्वभूमीवर प्रा. माधव सरकुंडे यांची 'वाडा' आणि बाबाराव मडावी ही आत्मवृत्तात्मक कादंबरी महत्त्वाची ठरते. या कादंबऱ्यांमधील नायक केंद्रवर्ती असून आदिवासी नायक प्रधान कादंबरी या विषयाचे संशोधन करण्यासाठी काही प्रतिनिधिक स्वरूपात आदिवासी कादंबरीकारांचा व त्यांच्या कादंबऱ्यांचा विचार प्रामुख्याने केला आहे.

माधव सरकुंडे यांची 'वाडा' ही कादंबरी असून या कादंबरीमध्ये 'अंध' या आदिवासी जमातीचे जीवन चित्रण येते. बाज्या हा केंद्रवर्ती भूमिकेत असून अन्याय अत्याचाराविरूद्ध आवाज उठविणारा आहे तर ग्यानबा पाटील हा आदिवासी समाजाचे शोषण करणारा पाटील आहे.आदिवासी समाजाला जमीनदारांच्या अन्यायाखाली व दडपशाहीखाली जगावे लागते आहे. याचेच वास्तवदर्शन या कादंबरीत घडवले आहे.

अंध समाजातील दारिद्र्यमय जीवन, अज्ञान, अंधश्रद्धा, भगतावरील विश्वास, जात पंचायतीला असलेले महत्त्व, देवदेवता, सणउत्सव, स्त्रियांवर होणारे लैंगिक अत्याचार यांचे दाहक चित्रण मांडत असतानाच निसर्गामुळे होणारी फरपट या कादंबरीचा मुख्य विषय बनते. एका बाजूला श्रीमंत वर्गाच्या अत्याचारामुळे व शोषणामुळे व दुसऱ्याबाजूला निसर्गाच्या अवकृपेमुळे होणारी अंध समाजाची दुरावस्था 'वाडा' या कादंबरीत चित्रित होते.

ग्यानबा पाटील ही व्यक्ती, अज्ञानी दरिद्री व अंध आदिवासींचे अतोनात शोषण करते. वर्षानुवर्षे हे असेच सुरू असते. वाड्याच्या भक्कम बांधकामामुळे व रचनेमुळे ज्याप्रमाणे आतील आवाज बाहेर येत नाही. त्याच प्रमाणे अंध समाजाचे दुःख, शोषण वर्षानुवर्षे सुरूच राहते. या दुःखाला वाचा फोडल्याचे काम 'वाडा' ही कादंबरी करते. या कांदबरीतील 'बाज्या' या शोषणाविरूद्ध उभा राहतो व 'ग्यानबा पाटलाला' संपवून टाकतो.

या कादंबरीवरून व बाज्याची कादंबरीतील असलेल्या केंद्रवर्ती भूमिकेवरून हे लक्षात येते की, पाटील आदिवासींचे शोषण करतो या विरोधात बाज्या ग्यानबा पाटलाला संपवतो. पण निसर्गाच्या लहरीपासून बाज्या त्यांच्या समाजबांधवांची सुटका करू शकत नाही. पाऊस न पडल्यामुळे शेतातील पिके वाळून जातात व सर्व आदिवासी गाव सोडून नवीन काम शोधण्यासाठी नवी जाग गाव वसविण्यासाठी जातात. त्यामुळे ज्या गावातील समाज बांधवांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात तुरूंगात जातो. गावाच्या ओढिने परत येतो पण गावात सामसूम आहे. मातीत पडलेल्या चाकांच्या खुणा त्याला पहायला मिळतात. त्यामुळे माधव सरकुंडे वाड्यातील ग्यानबा पाटलाने अंध आदिवासींचे केलेले शोषण व त्यातून बाज्यासारख्या तरूणाला अन्यायाच्या विरोधात आवाज उठविण्याची भूमिका शोषणाला विरोध करताना दिसते. त्यामुळे कादंबरीच्या केंद्रवर्ती असणाऱ्या बाज्याची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. त्यावरून बाज्याची व्यक्तिरेखा अधिक प्रखर झाल्याचे स्पष्ट होते.

'टाहो' ही बाबाराव मडावी यांनी लिहिलेली लघुकादंबरी असून पूर्वीचे आदिवासी जीवन आणि जंगलावर शासनाचे निर्बंध आल्यामुळे त्यांच्या मुक्त व्यवस्थेत बाधा आल्याने बदललेले आदिवासींचे जीवन या कादंबरीत चित्रीत केले आहे.

'भिम्या' या कादंबरीतील केंद्रवर्ती भूमिकेतील नायक आहे. दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींवर उच्च वर्णीय लोक आपल्या स्वार्थासाठी अन्याय–अत्याचार करतात. हे अन्याय अत्याचार सतत दाबून टाकण्याचा प्रयत्न केला जातो', या समाजातील तरूण शिक्षण घेतल्यामुळे अन्यायाविरूद्ध आवाज उठवितात. त्याचे प्रतिनिधित्व 'भिम्या' करताना दिसतो.

सरकारने आदिवासींना दिलासा देणारी जमीन हस्तांतरणाचा कायदा केला पण त्यातून अनेक समस्याही उद्भवल्या, जमीनदार व आदिवासींमध्ये वैमनस्य निर्माण होते. त्यातून प्राणघातक संघर्ष, निर्माण झाले. या संघर्षाचा इतिहास या कादंबरीच्या बीज रूपात येतो. भिम्या या शिकलेल्या तरूणाच्या प्रयत्नामुळे गावातील जमीनदार प्यारेलाल शेटला सजा होते. सावकाराच्या या पारंपारिक झोपड्यातून भिम्या आदिवासी बांधवांना मुक्त करतो. शिक्षणामुळे तो हे करू शकलेला असतो. त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व ओळखून तो आपल्या बांधवांसाठी रात्रीची शाळा सुरू करतो. त्यांना सरकारने केलेले कायदे माहित व्हावेत यासाठी भिम्या संविधानाची एक प्रत जंगलात आणतो. समग्र परिवर्तनाचे स्वप्न पाहणारा भिम्या आशावादी असल्यामुळे डोंगर गावातील लोकांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करतो. गावातील आपल्या समाज बांधवांना निवडणूकीचे महत्त्व समजावून सांगतो. सावकाराकडून होणारे शोषण थांबविण्यासाठी स्वतः उभा राहतो व निवडणूकीत जिंकतो. सरपंच बनतो. गावातील आरोग्याचे प्रश्न, अंधश्रद्धा संपवितो व लोकांच्या सावकाराने लुबाडलेल्या जमिनी परत करतो. सावकार प्यारेलाल कडून होणारे शोषण थांबवितो. हे सर्व या कादंबरीचे विषय बनून येतात. या कादंबरीवरून हे लक्षात येते की, जमीन हस्तांतराचा कायदा आदिवासींपर्यंत पोहचला आहे. त्याचा लाभ त्यांना सावकारासारख्या श्रीमंताकडून मिळाला नाही. म्हणून आदिवासी समाजाला अंधश्रद्धा, अज्ञान, दारिद्र्य, स्त्रियांचे लैंगिक शोषण व आरोग्याचे प्रश्न सावकारांकडून होणारा चाबकाचा मारा सहन करीत जगावे लागते. शोषण व आरोग्याचे प्रश्न सावकारांकडून होणारा चाबकाचा मारा सहन करीत जगावे लागते. परंतु भिम्याच्या शैक्षणिक व न्यायाच्या जाणिवेमुळे सावकाराला तुरूंगात जावे लागते व गावात शिक्षण दवाखाना, अंधश्रद्धा निर्मुलन होऊन लैंगिक व शारीरिक शोषण थांबते. नव्या परिवर्तनवादी व माणूसपणाचे हक्क मिळविण्यासाठीची सुरूवात 'टाहो' या कादंबरीतून झालेली लक्षात येते. त्यामुळे 'भिम्या' या केंद्रवर्ती भूमिका असणाऱ्या नायकाच्या मार्फत ते होत असल्याचे समजते.

गोपाळ गवारी यांच्या 'कोळीवाडा' या कादंबरीत महादेव कोळी या आदिवासी जमातीचे जे व्यक्तिचित्रण येते. 'कोळीवाडा' ही गोपाळ गवारी यांचे आत्मकथन स्वरूपाचे आहे. गोपाळ गवारी महादेव कोळी समाजात जन्मले असल्यामुळे ते सांगतात की महादेव कोळी समाज मागासलेला व अशिक्षित आहे. गरिबी, दारिद्र्य झटकवण्यासाठीची शैक्षणिक तळमळ अजून म्हणावी तशी या समाजात निर्माण झालेली नाही. शिक्षणाचे महत्त्व ओळखून शिक्षणानेच आपल्या समाजाचा सर्वांगिण विकास होऊ शकतो. म्हणून शिक्षणाविषयीची तळमळ हा या आत्मकथनपर कादंबरीचा विषय बनून समोर येते.

1980 ते 1995 या कालखंडातील समाजात झालेल्या परिवर्तनाचा वेध ही आत्मकथनात्मक कादंबरी घेत आहे. महादेव कोळी समाजातील दारिद्र्य, अज्ञान, विवाहप्रथा, सणोत्सव, देवदेवता, दारूचे व्यसन, श्रीमंतांकडून होणारे शोषण व स्वरूपात नायकाने भूमिका मांडली असल्याचे लक्षात येते.

गोपाळ गवारी यांनी आदिवासी समाजात शिक्षणाचा प्रसार करून समाजातील दारिद्र्य, अंधश्रद्धा, अज्ञान व विवाहप्रथा, व्यसनाधिनता, श्रीमंतांकडून होणारे शोषण हे या गोष्टींना आळा घालून समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न करतात. त्यामुळे गोपाळ गवारी हे परिवर्तनाचा आशावाद या कादंबरीतून निर्माण करतात.

## निष्कर्ष–

1. 'टाहो' या कादंबरीतील नायक 'बाज्या' श्रीमंत वर्गाच्या अत्याचारामुळे अंध समाजाची दुरावस्था झालेली दुरावस्था मांडतो आहे.
2. या कादंबरीच्या माध्यमातून जंगलविषयक कायदे निर्माण होण्याच्या पूर्वीच्या निसर्गावलंबी जीवनाचे स्वच्छंदी चित्रण येते.

3. आदिवासी कादंबरीतील नायक सरकारी योजनांमुळे प्रकल्पामुळे आदिवासींपुढे निर्माण झालेल्या समस्या मांडतात.
4. आदिवासी कादंबरीने दारिद्र्य, अज्ञान व विवाहप्रथा, सणोत्सव, देवदेवता, व्यवसाधिनता, समाजातील जाणिवा यांचे चित्रण कादंबरीतील नायक व्यक्त करतात.
5. आदिवासी कादंबरीकारांनी त्यांच्या जीवनात अनुभवलेले प्रसंग, प्रथा, रूढी, हक्क, अधिकार, सुधारणा याविषयी वाटणारी तळमळ या साहित्यातून व्यक्त करतात.
6. आदिवासी साहित्याच्या प्रेरणास्थानी असणाऱ्या विचारवंतांचा विचार साहित्यात येत नाही. त्यामुळे नायक कादंबरीच्या माध्यमातून चळवळ उभी करीत नाही.

## संदर्भ ग्रंथ–

1. माधव सरकुंडे, 'वाडा', देवयानी प्रकाशन, यवतमाळ, प्रथमावृत्ती, मे–1996.
2. बाबाराव मडावी, 'टाहो', प्रियंका प्रकाशन, यवतमाळ, प्रथमावृत्ती, नोव्हें. 1999.
3. गोपाळ गवारी, 'कोळीवाडा' मयुरवृत्त प्रकाशन, नाशिक प्रथमावृत्ती, जाने. 2004.

LBP PUBLICATION